जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट क्रमांक - ३४६ दिनांक -३०/०८/२०२४**

फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर

**पोलीस तात्काळ मदत क्रमांक १०० वर खोटी माहीती देणा-या इसमावर गुन्हा दाखल**

दिनांक २७/०८/२०२४ रोजी दहीहंडी उत्सवादरम्यान एका मोबाईल क्रमांक वरुन १०० नंबर वर (कंट्रोल) रुमवर कॉल करुन, कळविले की, “मी कमला नेहरु हॉस्पीटल जवळ (घटनास्थळी) एकटा असुन, ३० ते ४० लोक तलवार घेवुन फिरत असुन त्यांच्याजवळ दारुच्या बॉटल आहे मला मारहाण होऊ शकते. मला पोलीस मदत हवी आहे.” अशी माहिती पोलीस नियंत्रण कक्ष येथे प्राप्त झाली असता सदरचा कॉल हा बीट मार्शलला देण्यात आलेला होता. सदर बीट मार्शल वरील कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी जावून पाहणी केली असता तसा कोणताही प्रकार आढळून आला नाही म्हणून त्यांनी कॉलरला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता सदर कॉलरने त्यांचा मोबाईल क्रमांक हा बंद ठेवला असल्याचे आढळून आले. पुणे शहरात मोठया प्रमाणात दहीहंडी उत्सव साजरा होत असल्याने मोठया प्रमाणात पोलीस रस्त्यावर असताना देखील असा कॉल प्राप्त झाल्याने मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.अमितेश कुमार, यांनी सदरबाबत अत्यंत गांभीर्याने दखल घेवून त्याबाबत योग्य तो तपास करण्याच्या सुचना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत भस्मे यांना दिलेल्या होत्या.

सदर झालेल्या कॉलबाबत तपास सुरू करून कॉल करणा-या मोबाईलची तांत्रिक माहिती प्राप्त करण्यात आली असता सदरचा मोबाईल क्रमांक हा मंगळवार पेठेत राहणा-या महिलेच्या नावाने नोंद असल्याचे आढळून आले. सदर महिलेकडे चौकशी करता सदरचे सीम कार्ड हा तीचा बहीणीचा मुलगा नामे रोहित मुकेश चव्हाण वय २२ वर्षे रा.२५१ मंगळवार पेठ पुणे हा वापरत असल्याची माहिती प्राप्त झाली त्याप्रमाणे सदर मुलाकडे चौकशी करता त्याने दहिहंडीच्या दिवशी कामावर जात असताना त्याला रस्त्यावर गर्दी दिसल्याने त्याने सदरचा कॉल दिला असल्याचे सांगितले व त्यानंतर मोबाईल फोन बंद करून कामावर निघून गेला असल्याचे सांगितले. एकंदर झाले चौकशीमध्ये नमुद इसमाने पोलीस नियंत्रण कक्षाला जाणीपुर्वक खोटी माहिती दिल्याचे निष्पण्ण झाल्याने सदरबाबत बीट मार्शलवरील कर्मचारी पोलीस अंलदार विवेक पाटील,यांनी सदर इसमाविरुध्द सरकारतर्फे तक्रार दिल्याने त्याचेविरुध्द भारतीय न्याय संहिता-२०२३ कलम २१७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**पुणे शहर पोलीसांकडून सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, तात्काळ पोलीस मदतीसाठी असलेले फोन क्रमांक १०० व ११२ यांचा वापर अत्यंत सजगपणे, संवेदनशीलपणे करावा. विनाकारण, मजा म्हणून व त्रास देण्याच्या हेतून खोटे कॉल केल्यास त्यांचेवर कठोर कायदेशीर कारवाई होवू शकते.**

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, पुणे शहर, संदिप सिंह गिल्ल, मा.सहा.पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग,पुणे शहर श्रीमती नुतन पवार, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.प्रशांत भस्मे, पोलीस निरीक्षक(गुन्हे),अजित जाधव, सपोनि, वैभव गायकवाड, अन्सार शेख, पोउपनिरी. अरविंद शिंदे,पोलीस अंमलदार गौस मुलाणी, फरासखाना पोलीस ठाणे, पुणे शहर यांचे पथकाने केलेली आहे.